मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
। पश्चिम महाराष्ट्र ।
www.rajdand.com
follow us : /rajdandlive


हिरवा निसर्ग हा भवतीने ..अशा सुंदर मराठी गाण्याच्या ओळी हे दृश्य पाहिल्यावर ओठावर येतात. नुकत्याच पडलेल्या पावसाचे नयनरम्य दृश्य.

RNI Regd. No. 72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक ३१६ ✲ सातारा ✲ रविवार दि.१८ ऑगस्ट २०२४ पाने ४ ✲ किंमत ५/- रूपये

# योजना सुरुच राहणार

## पुण्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा शानदार शुभारंभ



**पुणे :** राज्यात काही दिवसातच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांची सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली आहे. दरम्यान, पावसाळी अधिवेशनात राज्य सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरू केली आहे. या योजनेची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. विरोधकांनी महायुती सरकारविरोधात आरोप सुरू केले आहेत. पुण्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राज्यस्तरीय लाभ वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते, यावेळी पत्रकारांसोबत संवाद साधत असताना विरोधकांवर निशाणा साधला.

आज माझ्या लाडक्या बहीणींसाठी आनंदाचा दिवस आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून बहीणींच्या खात्यात पैसे जमा झाले. दीड कोटीपेक्षा बहीणींच्या खात्यावर पैसे जमा झाले. हे एक मुख्यमंत्री म्हणून मला आनंद आहे. सर्वसामान्यांच्या खात्यावर पैसे जाणे म्हणजे अभिमानाची बाब आहे, असंही एकनाथ शिंदेम्‌ हणाले. सगळ्या अडचणी उत्पन्न करण्याचे काम विरोधकांनी केले. एखादी योजना आणायची असेल तर त्यासाठी खूप काम करावं लागतं. यासाठी आम्ही काम केलं आहे. या योजनांमुळे विरोधक बिथरले आहेत, असा टोलाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लगावला.

'आम्ही जे बोलतो ते करतो, आम्ही रक्षाबंधनाच्या आधी पैसे जमा करणार हे सांगितलं होतं. आता पैसे जमा होत आहेत. आम्ही बहीणींना शब्द दिला होता तो आता पूर्ण झाला आहे. विरोधक या योजनेला बदनाम करत होते, विरोधक असं म्हणत होते की, हे विकत घेत आहे का? लाच देत आहे का? असे उद्गार विरोधकांनी काढले मी काही बोलत नाही, मी आरोपाला कामातून उत्तर देतो.माझ्या लाडक्या बहीणी योग्य ते उत्तर देतील, असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

विरोधक एवढ्यावर थांबले नाहीत, ते कोर्टातही गेले. कोर्टानेही त्यांना फटकारले आणि माझ्या लाडक्या बहीणींच्या बाजूने न्याय दिला. यामुळे कितीही त्यांनी कितीही काही केले तरी योजना थांबणार नाही. या योजनेचे सर्व नियोजन आम्ही केले आहे. आम्ही ३३ हजार कोटी रुपयांचे नियोजन केले आहे. आम्ही भविष्यात यात रक्कम वाढवू, तीन हजार करु, असंही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## पंढरपूर दर्शन मंडपासह 'स्काय वॉक'साठी ११० कोटींच्या आराखड्याला मान्यता



**सोलापूर :** पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना त्रास होऊ नये म्हणून बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेला दर्शन मंडप आणि 'स्काय वॉक'चा प्रश्न जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून मार्गी लागत आहे. जिल्हा प्रशासनाने सादर केलेल्या १२९ कोटी रुपयांच्या आराखड्यापैकी राज्याच्या मुख्य सचिव सुनीता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने ११० कोटी रुपये खर्चाचा आराखडा मंजूर केला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या बैठकीत हा आराखडा अंतिम होऊन शासन निर्णय निघेल, अशी अपेक्षा आहे. पंढरपुरात दरवर्षी आषाढी व कार्तिकीसह माघी आणि चैत्री वारीला लाखो भाविक आणि वारकरी येतात. वर्षभरात एक कोटीहून जास्त भाविकांची मांदियाळी पाहायला मिळते. भाविकांची वाढती गर्दी पाहता सध्याची दर्शनरांग व्यवस्था अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे दर्शन मंडप व स्काय वॉक या माध्यमातून भाविकांना सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या प्रशासनाने १२९ कोटी रुपये खर्चाचा आराखडा तयार केला होता.आणखी वाचा-उद्धव ठाकरे हेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत - अंबादास दानवेजिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीने या आराखड्याला मान्यता दिल्यानंतर हा आराखडा सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीत सादर करण्यात आला असता या समितीनेही या आराखड्याला मान्यता दिली होती. त्यानंतर शासनाच्या मुख्य सचिव सुनीता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीनेही बारकाईने तपासणी करून ११० कोटी खर्चाच्या या आराखड्याला हिरवा कंदील दाखविला आहे. त्या पाठोपाठ मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्या अध्यक्षतेखालील व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्रीअजित पवारहे सदस्य असलेल्या राज्य शिखर समितीकडे हा आराखडा सादर केला जाईल. येत्या सप्टेंबर महिन्यात राज्य शिखर समितीकडून या आराखड्यास अंतिम मान्यता मिळेल व त्यानंतर लवकरच शासन निर्णय निघेल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार

## थोडक्यात

### राणेंच्या मोर्चाला परवानगी देऊ नका, अन्यथा; सकल मराठा समाज आक्रमक

**इंदापूर :** इंदापूर शहरातील मालोजीराजे गढी येथील अतिक्रमण हटवण्याबाबत १८ ऑगस्टला आमदार नितेश राणे यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात येणार आहे. त्या मोर्चास प्रशासनाने परवानगी नाकारावी, अशी मागणी सकल इंदापूर तालुका मराठा समाजाकडून करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन तहसीलदार जीवन बनसोडे व पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांना दिले आहे.

इंदापूर शहरातील मालोजीराजे गढी अतिक्रमण हटवणेबाबत मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व करणारे लोक इंदापूर तालुक्याबाहेरील असून, केवळ राजकीय हव्यासापोटी हा मोर्चा काढण्यात येत आहे. त्यामुळे इंदापूर शहरामध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तसेच जातीय दंगल होण्याची शक्यता आहे. मोर्चाचे नेतृत्व करणारे आमदार नितेश राणे वारंवार मराठा आरक्षणाचा ज्वलंत प्रश्न असताना मराठा मोर्चा चे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्यावर व सकल मराठा समाजावर खालच्या पातळीवर भाष्य करतात. मराठा समाजाच्या एकमुखी मागणीला विरोध करून मराठा समाजामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे समाजाच्या भावना दुखावतात. म्हणून प्रशासनाने या मोर्चास परवानगी नाकारावी. अन्यथा होणाऱ्या परिणामाला प्रशासन जबाबदार राहील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर महादेव सोमवंशी, आश्रम फडतरे, रोहित पाटील, प्रवीण पवार, गोरख शिंदे,बंडू ननवरे, पवनराजे घोगरे, सचिन सावंत, संकेत माने, गणेश चोपडे, प्रदीप पवार आदींच्या सह्या आहेत.

## लाडकी बहीण योजनेवरून फडणवीसांचा घणाघात

**पुणे :** पंधराशे रुपयात महिलांना विकत घेत असल्याचे विरोधक म्हणत आहेत. पण नालायकांनो आई, बहिणींचे प्रेम कोणीही खरेदी करु शकत नाही. ही योजना माता-भगिणींच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासठी आहे. त्यांचे प्रेम, साथ यामुळे आम्हाला यश मिळत आहे. पण, सोन्याचा चमचा तोंडांत घेऊन जन्माला आलेल्या लोकांना पंधराशे रुपयांचे मोल समजणार नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीकास्त्र डागले. ते पुण्यात लाडकी बहिण योजनेच्या कार्यक्रमात बोलत होते.

ज्यावेळी आम्ही लाडकी बहिण योजनेची घोषणा केली. त्यावेळी तुमच्या सावत्र भावांच्या पोटात खूप दुखायला लागले. ही योजना होऊ नये म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. त्यानंतर ते कोर्टात गेले. कोर्टाने नाकारल्यानंतर त्यांनी फॉर्मवर पुरुषांचे फोटो लावले. जेणेकरूनमहिलांची फसवणूक करता येईल. जाणीवपूर्वक बनावट फॉर्म भरले गेले. महिलांपर्यंत ही योजना पोहचू नये म्हणून खूप प्रयत्न केले गेले. हेही करून हे लोक थांबले नाहीत. आपले पोर्टल स्लो होण्यासाठी त्यांनी त्यांनी आपल्या पोर्टलवर जकं डेटा टाकला,' अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

## सातारा शहरात ढगफुटीसदृश वादळी पाऊस

**सातारा :** शहरात सायंकाळी जोरदार वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात, ढगांच्या गडगडाटात मुसळधार पाऊस झाला. या पावसाने सर्वत्र पाणी केले. मागील काही दिवसांपासून उघडीप घेतलेला पाऊस आज जोरदार वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात, ढगांच्या गडगडाटात अवकाळी सदृश बरसला. सातारा शहरासह जिल्ह्यात शनिवारी सायंकाळी ठिकठिकाणी सुमारे तासभर मुसळधार पाऊस झाला. शहरात बऱ्याच ठिकाणी गुडघाभर पाणी साचले.



जुलै महिन्याच्या आषाढ नक्षत्रात तब्बल तीन आठवडे जोरदार पाऊस झाल्याने कोयना धरण ९० टीएमसीवर पोहोचले आहे. पावसाने उघडीप घेतल्याचे दिसत असतानाच शनिवारी पुन्हा मुसळधार पाऊस झाला. कोयना, नवजा, महाबळेश्वर, कराड,पाटण अशा बहुतांश भागांमध्ये सायंकाळी उशिरा जोरदार पाऊस झाल्याचे वृत्त आहे. दुष्काळी माण, खटाव तालुक्यातही अनेक भागांत शुक्रवारी सायंकाळी जोरदार पाऊस आला होता. शनिवारी सायंकाळी सातारा शहरात पाऊस झाला. या पावसाचा खरीप हंगामातील पिकांना फायदा होणार आहे. मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेव उपमुख्यमंत्र्यांचा रविवारी सातारा दौरा होत आहे. पावसामुळे विसावा नाका येथे वाऱ्यामुळे लाडकी बहीण योजनेच्या प्रसिद्धीसाठी लावलेले फलक रस्त्यावर कोसळले. आणखी वाचा-सोलापुरात मघा नक्षत्राच्या सरी खरीप पिकांसाठी पोषकशहरात रस्त्यावरून पाण्याचे प्रचंड लोट वाहत होते तर सखल भागामध्ये पाणी साचले. त्यामुळे नागरिकांना बाहेर पडणे अशक्य झाले होते. सातारा शहरात सायंकाळी उशिरा मुसळधार पावसामुळे शहराच्या पश्चिम भागामध्ये वीज खंडित झाली होती. सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. सातारा शहराबरोबरच महाबळेश्वर, पाचगणी, वाई, भुईंज येथेही मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.

## सर्वाधिक दर देणारा सोमेश्वर ठरला अग्रस्थानी

### सोमेश्वर कारखान्याकडून ३७७१ रुपयांचा उच्चांकी ऊसदर

**बारामती :** बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने मागील २०२३-२०२४ गाळप हंगामाकरिता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रति मे.टन रुपये ३,५७१ चा उच्चांकी ऊसदर जाहीर केला आहे. संपूर्ण राज्यात एफआरपीपेक्षा प्रति मे.टन ६९७ रूपये जास्त दर देणारा सोमेश्वर कारखाना राज्यातील क्रमांक एकचा कारखाना ठरला आहे.

नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये या सर्वोच्च ऊसदरावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी दिली. तसेच कारखान्याने कार्यक्षेत्रातील सभासद व बिगर सभासद यांच्या जानेवारीमध्ये तुटणाऱ्या ऊसास प्र.मे.टन ७५ रूपये फेब्रुवारीमध्ये तुटणाऱ्या ऊसास प्र.मे.टन १०० रूपये, मार्चमध्ये तुटणाऱ्या ऊसास प्र.मे. टन १५० रूपये व त्यानंतर हंगामसंपेपर्यंत तुटणाऱ्या ऊसास प्र.मे.टन २०० रूपये अनुदानासह अनुक्रमे जानेवारीमध्ये तुटलेल्या ऊसास प्र.मे.टन ३,६४६ रूपये फेब्रुवारीमध्ये तुटलेल्या ऊसास प्र.मे.टन ३,६७१ रूपये मार्चमध्ये तुटलेल्या ऊसास प्र.मे.टन ३,७२१ रूपये तर मार्चनंतर हंगामसंपेपर्यंत तुटलेल्या ऊसास प्र.मे.टन ३,७७१ रुपयांचा ऐतिहासिक असा ऊस दर कारखान्याने आजच्या संचालक मंडळाच्या बैठकीत जाहिर केल्याची माहिती जगताप यांनी दिली.

जगताप यांनी दिलेल्या त्याचसोबत कारखान्याच्या को-जन प्रकल्पामधून १०,४९,५१,१३६ युनिट्सची वीजनिर्मिती केली असून ५,८२,१७,६०४ युनिट्सची वीजविक्री केलेली आहे.

त्याचप्रमाणे कारखान्याच्या डिस्टीलरी प्रकल्पातून १,००,२१,००० लिटर्स अल्कोहोलचे उत्पादन घेतले असून सोबत ४०,७३,७७३ लिटर्स इथेनॉलचे उत्पादन घेतले आहे.

पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असेही ते म्हणाले.रक्षाबंधन सणानिमित्ताने भावांकडून बहिणीला ओवाळणी-उपमुख्यमंत्री अजित पवारउपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याकरीता अर्थसंकल्पातमुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेला माता-भागिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भागिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रुपये जमा करण्यात आले आहे. या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, हसू दिसून येत आहे. रक्षाबंधन सणानिमित्ताने

## कोल्हापुरातील खड्डेमय रस्त्यावर 'डर्ट ट्रॅक रोड-शो' स्पर्धेचं अनोख आंदोलन



**कोल्हापूर :** कोल्हापुरातील शाहूपुरी आणि ताराबाई पार्क परिसरात असलेल्या खड्डेमय रस्त्याकडे कोल्हापूर महानगरपालिकेचं लक्ष वेधण्यासाठी 'डर्ट ट्रॅक रोड-शो' स्पर्धेचं आयोजन करून आंदोलन करण्यात आलं. या अनोख्या आंदोलनाची आज दिवसभर शहरात चर्चा होती.

कोल्हापूर शहरातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली असून रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. गणेशोत्सव सण तोंडावर आला तरी, कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाकडून याची गांभीर्यानं दखल घेतली जात नाही. त्यामुळं माणसांना आणि वाहनांना खिळखिळ्या करणाऱ्या या रस्त्याच्या दुरुस्तीकडे प्रशासनाचं लक्ष वेधण्यासाठी चक्क 'डर्ट ट्रॅक रोड-शो' या स्पर्धेचं आयोजन करून अनोख आंदोलन करण्यात आलं.

ताराबाई पार्क मेन रोड ते डी मार्ट पर्यंतच्या खड्डेमय रस्त्यावर लोकांना डर्ट ट्रॅक या स्पर्धेत रेसिंग बाईकचा थरार पहायला मिळाला. यावेळी ढोल-ताशा-पथक, आकर्षक स्पर्धा कमान, टायर्स आणि रंगबेरंगी झेंड्यांनी ताराबाई पार्कमधील मुख्य रस्ता सजवण्यात आला होता. या अनोख्या आंदोलनाची चर्चा शहरभर होतीय. यावेळी माजी नगरसेवक रत्नेश शिरोळकर यांनी, रस्ते दुरुस्तीकडे कोल्हापूर महानगरपालिकेचं लक्ष वेधून घेण्यासाठी या अनोख्या 'डर्ट ट्रॅक रोड-शो' स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं असल्याचं सांगितलं.

## नगरमध्ये अहिल्यादेवींचे होणार स्मारक मंत्री विखेंचा पुढाकार

**अहमदनगर :** स्टॅच्यु ऑफ युनिटीच्या धर्तीवर अहमदनगरमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे स्मारकाच्या उभारणी साठी राज्याचे महसूलमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. अहील्यादेवींचे स्मारक आणि नेवासा येथील ज्ञानेश्वर सृष्टीचा प्रकल्प जिल्ह्याच्या दृष्टीने माइलस्टोन ठरणार आहेत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

अहमदनगरमध्ये स्टॅच्यु ऑफ युनिटीच्या धर्तीवर पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे स्मारक होणार आहे. यासाठी महसूलमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, स्टॅच्यु ऑफ युनिटीच्या धर्तीवर उभारण्यात येणारे अहील्यादेवींचे स्मारक आणि नेवासा येथील ज्ञानेश्वर सृष्टीचा प्रकल्प जिल्ह्याच्या दृष्टीने माइलस्टोन ठरणार असून, दोन्ही प्रकल्पाच्या आराखड्यात सुधारणा करून लवकराच याचे सादरीकरण केंद्र व राज्य सरकार समोर करण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकरांचे जन्मदिनाच्या त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून अहील्यानगर येथे स्टॅच्यु ऑफ युनिटीच्या धर्तीवर त्यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतला. याबाबतची कार्यवाही सुरू झाली असून प्रकल्पाचा आराखडा तसेच स्मारकासाठी शहरात जागा निश्चित करण्याचे काम प्रशासकीय स्तरावर अंतिम टप्प्यात आले आहे. महीला सक्षमीकरणाची संकल्पना स्मारक उभारण्याची आहे. यासाठी स्मारक उभारणीतील सर्व बारकावे तपासून पाहीले जात आहेत. आराखडा अंतिम झाल्यानंतर याचे सादरीकरण राज्य सरकारच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समोर केले जाणार असून स्मारकासाठी केंद्र सरकारचा निधी उपलब्ध व्हावा असा प्रयत्न असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर आणि नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदीर परीसराच्या विकासाच्या आराखड्याचे सादरीकरण पालकमंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

तयार करण्यात आलेल्या सादरीकरणात आवश्यक बदल करण्याच्या सूचना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. अहील्यादेवीचे कार्य खूप मोठे होते. स्मारकाच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा संदेश मिळावा आशा संकल्पनेतून स्मारकाचा आराखडा तयार करण्याचे मंत्री विखे पाटील यांनी सुचित केले. स्मारकासाठीची जागा निश्चित करण्यासाठी प्रशसानाने कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. संत ज्ञानेश्वर परिसर विकास आराखड्याच्या मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरु

नेवासा येथील मंदीर परीसर विकास आरखड्याच्या संदर्भात राज्य सरकारने अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा निर्णय घेतल्याने निधी उपलब्ध होणार आहे. या तिर्थस्थानाचे अध्यात्मिक महत्व लक्षात घेवून अकरा एकर जागेत स्मारकाचा आराखडा त्या तिर्थस्थानाचे असलेले महत्व लक्षात घेवून त्या अनुभूतीने व्हावा अशी अपेक्षा मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली. ज्ञानेश्वर सृष्टी उभारण्यासाठी जिल्हा प्रशासनाने दोनशे कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला असून त्याला लवकर मंजूरी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

# अंतरिक ऊर्जा वाढवून जीवन संतुलित करा : मिसेस युनिव्हर्स टॉलरन्स डॉ.प्रचिती पुंडे

**पुणे** : अनेक समस्यांपासून स्वतःला मुक्ती मिळवायची असेल तर शरीराव्यतिरिक्त स्वतःला आजच्या आधुनिक जगात ग्लॅमोवेल पद्धतीमध्ये सहज आणि कमी वेळात वर्क लाइफ बॅलन्स करायल शिका. चिंतन करून स्वतःचे गुण लक्षात घेऊन क्षणिक आवेग, आकांक्षा आणि नकारात्मक विचारांच्या प्रवाहांना नियंत्रित करून योग्य दिशा दिली जाऊ शकते. त्यातुनच शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उपलब्ध होते.असे विचार प्रोलक्स प्रोडक्शनच्या संस्थापक संचालिका आणि मिसेस युनिव्हर्स टॉलरन्स डॉ.प्रचिती पुंडे यांनी व्यक्त केले.



प्रोलक्स ग्लॅमोवेलच्या वतिने 'प्रोलक्स गाला: द ग्लॅमोवेल एक्स्ट्रावागांझा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुणे शहरात ८ ते ११ ऑगस्ट या काळात विविध ठिकाणी रॅली काढण्यात आली.

आपल्या व्यस्त जीवनात ग्लॅमर आणि आरोग्य यांच्यातील समतोल राखण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या मुख्य उद्देश्य ठेऊन या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली प्रोलेक्स आणि ग्लॅमोवेलचे बाणेर येथील मुख्यालयातून शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी ४ दिवस काढण्यात आली. डॉ.प्रचिती पुंडे यांच्या नेतृत्वात निघालेल्या रॅलीत शेकडो नागरिकांनी उत्फूर्तपणे सहभाग दर्शविला.

एनसीसी हेड क्वॉटर, टाईम्स अॅण्ड ट्रेड आणि डेक्कन येथील श्री महावीर जैन विद्यालय येथील विद्यार्थी, कर्मचारी व उपस्थित नागरिकांना डॉ.प्रचिती पुंडे यांनी ३ ते ३० सेकंदापेक्षा कमी वेळेत जीवन सहजरित्या कसे करावे या संदर्भात छोट्या टीप्स दिल्यात.

आयोजित कार्यक्रम रश्मी मॅडम, कमांडर अल्पेश मोहन, ट्रेनर व डिपार्टमेंटल एचओडी राजेश सिंग, तरावडे आणि यशराज यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला. डॉ.प्रचिती पुंडे म्हणाल्या, आपण आपली आंतरिक ऊर्जा दिवसभर वापरतो. पण ती साठवत नाही, ज्यामुळे जीवन असंतुलित होते. हे संचित करून मनुष्य आपल्या जीवनाचा समतोल साधू शकतो. आजची पिढी मोबाइल व बाह्य जगात स्वतःला विसरली आहे. त्यामुळे ग्लॅमोवेल मुळे स्वयं प्रेरणेची गरज आहे. त्याचप्रमाणे एनसीसीचे विद्यार्थ्यांना होणार्या मसल पेन कमी करण्यासाठी आंतरिक मन ढासळू देऊ नये यासाठी मनावर सरळ सरळ ताबा कसा मिळवावा या संदर्भात अॅक्यूप्रेशर पॉइंट व ग्लॉमोवेलच्या टिप्स दिल्यात.

आनंदी जीवनासाठी प्रत्येकाशी हसतमुख बोलावे. कामाच्या ठिकाणी इंटरपर्सनल रिलेशन मॅनेज कसे करावे यावर विस्तृत माहिती डॉ. पुंडे यांनी दिली. विद्यार्थीदशेत मुले सतत मोबाइलच्या आहारी जातात. त्यांच्या समोर सक्सेस, नोकरी, शारीरिक व्यायामाचा अभाव, प्रत्येक गोष्टीची काळजी करणे या सर्वांपासून सुटकेसाठी डॉ. पुंडे यांनी ऊर्जा जागृतीच्या टीप्स दिल्यात. तसेच आपले प्रश्न आपण कसे सोडवायचे या संदर्भातील व्यायाम शिकविण्यात आले.

# सय्यद यांच्या सामाजिक कार्याचा गौरव ।

म्हसवड : सर्वसामान्य ग्रामस्थांची व दिव्यांग बांधवांची सेवाभावी नेहमीच मदत करणार्या वरकुटे - म्हसवड येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रहार जनशक्ति पक्षाचे माण तालुका उपाध्यक्ष फिरोज सय्यद यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवुन वरकुटे ग्रामपंचायतीच्या वतीने गौरव करण्यात आला.

दरवर्षी भारतीय स्वांतत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनानिमीत्त गावासाठी चांगले काम करणार्या व्यक्तींचा सन्मान करण्याची परंपरा वरकुटे ग्रामपंचायतीने जोपासली आहे, या ग्रामपंचायतीने सुरु केलेला हा उपक्रम इतर सर्वच ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादाई असा ठरला आहे. यंदाही भारतीय स्वातंत्र्य दिनानिमीत्त गावासाठी व सामान्यांसाठी नेहमीच धावुन जात असलेल्या फिरोज सय्यद यांच्या आजवरच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांचा ग्रामपंचायत वरकुटे म्हसवड यांच्यातर्फे १५ ऑगस्ट ला सत्कार करण्यात आला याप्रसंगी मानपंचायत समिती व सातारा नियोजक समितीचे सदस्य श्रीराम पाटील तसेच डी. वाय. एस. पी. इंगळे, जेष्ठ पत्रकार व साहित्यीक अजित काटकर, ग्रामपंचायतचे सरपंच मारुती आबा मोठे तसेच नारायण जाधव मंडळाचे अध्यक्ष सुभाष बापू, युवा नेते अमोल माने, युवा नेते काकासाहेब माने, इकबाल मुलाणी, मुंबईकर व ग्रामस्थ, अंगणवाडी सेविका आदी उपस्थित होते.

# 'कृष्णे' चे प्रदूषण रोखायचे की; ३० कोटींचा भुर्दंड सोसायचा?

**सांगली** : कृष्णा नदीच्या प्रदूषणप्रश्नी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेसांगली, मिरज, कुपवाड महापालिकेस ९० कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. काही तांत्रिक बाजू महापालिकेने स्पष्ट केल्यानंतर हा दंड आता ३० कोटींवर आला आहे. एका बाजूला दंडाची ही टांगती तलवार महापालिकेच्या डोईवर लटकत असताना नदीप्रदूषण रोखण्यासाठी तयार केलेला ९४ कोटी रुपयांचा प्रकल्प राज्य शासनदरबारी प्रलंबित आहे.



शासन निर्णयावर आता बऱ्याच गोष्टी अवलंबून राहणार आहेत. स्वतंत्र भारत पक्षाने नदी प्रदूषणाबाबत हरित न्यायालयात याचिका दाखल केली आहे. जिल्हा संघर्ष समितीने याचा पाठपुरावा केला होता. प्रदूषण नियंत्रण मंडळाला हरित न्यायालयाने कारवाईबाबत आदेश दिल्यानंतर मंडळाने प्रदूषणाच्या प्रमाणानुसार काही महिन्यांपूर्वी ९० कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. कृष्णा नदीत २०२२ च्या जुलै व ऑगस्ट महिन्यात लाखोंच्या संख्येने मासे मृत झाले होते. याप्रकरणी सखोल चौकशी होऊन कारवाई करण्याच्या मागणीसह नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी स्वतंत्र भारत पक्षाचे नेते सुनील फराटे यांनी पुणे येथील हरित न्यायालयात याचिका दाखल केली होती. हरित न्यायालयाने याप्रकरणी चौकशी समिती नियुक्त करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार काही साखर कारखाने व सांगली, मिरज, कुपवाड महापालिका यांना नदी प्रदूषणाबद्दल दोषी ठरविले होते. न्यायालयाने याप्रकरणी दंडाची रक्कम निश्चित करण्याचे आदेश मंडळाला दिले होते. त्यानुसार हा दंड झाला होता. इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेला दंड अन्यायी असल्याचे सांगत काही तांत्रिक मुद्यांवर संघर्ष केल्यानंतर तो दंड ३० कोटींवर आला आहे. याशिवाय जोपर्यंत सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प अस्तित्वात येणार नाही, तोपर्यंत दंडाची ही रक्कम वाढतच जाणार आहे. त्याचा भारही अप्रत्यक्ष नागरिकांवर पडणार आहे. शासनाकडे प्रस्ताव सादर महापालिकेने शेरी नाल्यासह संपूर्ण सांडपाण्याचे शुद्धीकरण करण्याची ९४ कोटी रुपयांची योजना आखून त्याबाबतचा सविस्तर प्रकल्प आराखडा राज्य शासनाला सादर केला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याची प्रतीक्षा आहे.

महापालिकेने पाठविलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा प्रशासकीय स्तरावर सुरू आहे. मात्र, जिल्ह्याचे खासदार व स्थानिक आमदारांनी याबाबत पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. मंडळाने महापालिकेने दंडाची नोटीस बजावताना पंधरा दिवसांत रक्कम जमा करण्यास सांगितले आहे. बँक खात्याचा क्रमांकही त्यांनी आदेशात दिला आहे.

**असे रोखले जाणार प्रदूषण...**

सांगलीतील महावीरनगर ट्रक पार्किंगच्या जागेत २२ दशलक्षलीटर प्रतिदिन तर सांगलीवाडीत ३ दशलक्ष लीटर प्रतिदिनचा मलशुद्धीकरण प्रकल्प उभारला जाईल. नदीकाठावरील मारुती मंदिर व सांगलीवाडीतील ज्योतिबा मंदिराजवळ दोन पम्पिंग स्टेशन उभारले जाणार आहेत. सांडपाण्यावर प्रक्रिया करून शुद्ध पाणी धुळगाव येथील शेतकऱ्यांना दिले जाईल. शेतकऱ्यांना गरज नसेल तेव्हा हेच शुद्ध पाणी पुन्हा नदीत सोडले जाईल.

# सरपंच मानधनासह कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे ९१ कोटी जमा

**कोल्हापूर** : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच यांचे मानधन आणि ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे वेतन अजिबात प्रलंबित राहू नये याची काळजी ग्रामविकास विभागाने घेतली आहे. नेहमी ईआरपी प्रणालीने ही रक्कम अदा होत असली तरी सध्या ही प्रणाली राबवण्यात तांत्रिक अडचणी असल्याने जुलै आणि ऑगस्ट २०२४ च्या मानधन, वेतनाचे ९१ कोटी १७ लाख ८४ हजार रुपये शासनाकडून ऑफलाइन पद्धतीने अदा करण्यात आले आहेत.



'आपले सेवा केंद्र' चालवणारी राज्यस्तरीय कार्यरत कंपनी बदलण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यामुळे मानधन आणिनिधीवितरणामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. याची दखल घेत पंचायत राज विभागाच्या राज्य व्यवस्थनापन कक्षाने हानिधीजिल्हा परिषदांना वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. पंचायत राजचे संचालक सचिन घाडगे यांनी याबाबतचे सविस्तर पत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवले असून, त्यानुसार जिल्हा परिषदेच्या पातळीवर कार्यवाहीही सुरू झाली आहे.

राज्यात साडे अठ्ठावीस हजार ग्रामपंचायती कार्यरत आहेत. परंतु, काही ठिकाणी सरपंच आणि उपसरपंच राजीनामा देत असल्याने त्या ठिकाणी नव्याने निवडी केल्या जातात. त्यामुळे ग्रामपंचातींच्या संख्येपेक्षा सरपंच, उपसरपंच यांची संख्या अधिक दिसून येत आहे.

# रुग्णसेवेबाबत लायन्स क्लबचे योगदान कौतुकास्पद : डॉ. युवराज करपे


**सातारा** : रुग्णसेवेबाबत लायन्स क्लब चे योगदान कौतुकास्पद आहे. लायन्स क्लब सातारा ने विविध उपक्रमांमधून समाजाप्रती जी बांधिलकी जपली आहे, ती नेहमीच इतरांना प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे यांनी केले.

सातारा जिल्हा रुग्णालयात जिल्हाभरातून रुग्ण येत असतात. तसेच त्यांच्याबरोबर त्यांचे नातेवाईकही असतात. त्यांची पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता १५ ऑगस्ट या भारताच्या स्वातंत्र्यदिनी लायन्स क्लब ऑफ सातारा जनसेवा यांच्यावतीने सातारा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये येणार्या रुग्णांसाठी व त्यांच्या नातेवाईकांसाठी तसेच हॉस्पिटलमधील कर्मचारी, मेडिकल कॉलेजचे स्टुडन्ट तसेच स्टाफ साठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय व्हावी म्हणून जिल्हा रुग्णालयाच्या आवारामध्ये वॉटर एटीएम मशीन बसविण्यात आली. जेणेकरुन सगळ्यांना याचा नाममात्र शुल्कात लाभ घेता येईल. या वॉटर एटीएम मशीनच्या लोकार्पण प्रसंगी सातारा जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर युवराज करपे, तसेच डॉक्टर मेजर राहुलदेव खाडे व सिव्हिल हॉस्पिटल चे सर्व डॉक्टर्स, त्याचबरोबर लायन्स क्लब ऑफ सातारा जनसेवा च्या अध्यक्षा डॉक्टर कामिनी पाटील, पीडीजी लायन प्रभाकर आंबेकर, लायन प्रशांत साळुंखे, फार्मसी स्टेट कौन्सिल चे संचालक लायन प्रवीण पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य उपाध्यक्ष सागर भोगांवकर, लायन चंद्रजीत पाटील, लायन अमितराज शेटे, खजिनदार लायन सावळाराम गहलोत, लायन चौधरी, लायन मनीष आंबेकर, लायन रमेश ओसवाल, लायन उत्तमसिंग देवल, लायन हिंदुराव शिंदे, लायन मंगलसिंग पुरोहित, लायन मोहन पुरोहित आदी मान्यवर उपस्थित होते.

लायन्स क्लब ऑफ सातारा जनसेवा यांनी केलेल्या या सामाजिक कार्याबद्दल रुग्णालयातील रुग्ण, त्यांचे नातेवाईक, विविध विभागांचे डॉक्टर्स, सिस्टर्स तसेच संपूर्ण स्टाफने लायन्स क्लबचे आभार मानले आहेत. लायन्स क्लबच्या माध्यमातून डायलिसिस सेंटर

# पावसाची ओढ; उकाड्यात वाढ

**मुंबई** : पावसाने गेल्या आठवड्यात दिलेली ओढ येत्या आठवड्यातही कायम राहणार असून कोकण विभागामध्ये मोठ्या फरकाने सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद होईल, अशी शक्यता आहे. गुरुवारी जारी झालेल्या येत्या दोन आठवड्यांच्या पूर्वानुमानानुसार, राज्यातही २२ ऑगस्टपर्यंत पावसाचा खंड कायम असेल. त्यामुळे तापमानामध्येही वाढ होण्याचा तसेच मुंबई आणि परिसरात उकाड्याचा स्तर कायम राहण्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरीपेक्षा तीन ते पाच अंशांनी अधिक आहे.



कोकण विभागातही दोन ते तीन अंशांनी, तर मराठवाड्यात तीन ते चार अंशांनी कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त आहे. सध्या वाढलेल्या तापमानाचा फटका पिकांना बसू शकतो, याबद्दल इशारा देण्यात आला आहे. विदर्भाच्या काही भागांत १५ ते २२ ऑगस्टच्या आठवड्यात पाऊस पडू शकतो. उर्वरित राज्यात मात्र फारसा पाऊस नाही. वाढलेल्या तापमानामुळे मेघगर्जनेसह संध्याकाळच्या सुमारास पावसाची शक्यता आहे.

मुंबईमध्ये कमाल तापमान कुलाबा आणि सांताक्रूझ दोन्ही केंद्रांवर सरासरीपेक्षा दोन अंशांनी अधिक नोंदवले जात आहे. वाढलेले तापमान आणि वाढलेल्या आर्द्रतेमुळे मुंबईकरा मध्ये अस्वस्थता अधिक जाणवत आहे. रत्नागिरी केंद्रावर गुरुवारी कमाल तापमान सरासरीपेक्षा ३.४ अंशांनी अधिक होते. मध्य महाराष्ट्रात पुणे येथे ४.४, लोहगाव येथे ४.८, सातारा येथे ५.४ अंशांनी कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक होते.

मराठवाड्यातही छत्रपती संभाजी नगर येथे कमाल तापमान सरासरीपेक्षा चार अंशांनी अधिक नोंदले गेले. विदर्भात ब्रह्मपुरी आणि यवतमाळ येथे सरासरीपेक्षा कमाल तापमान मोठ्या फरकाने अधिक होते. गुरुवारी ब्रह्मपुरी येथे राज्यातील सर्वाधिक कमाल तापमान नोंदले गेले. ३५.६ अंश सेल्सिअससह हे तापमान सरासरीपेक्षा ५.७ अंशांनी अधिक होते. चंद्रपूर येथेही ३५ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले.

# दीड कोटी रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट : एकनाथ शिंदे

**मुंबई** : राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि येथील नागरिकांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी या सर्व घटकांच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून विकासाला चालना देण्याचे काम होत आहे. विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी दीड कोटी रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी धोरणांची- योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिली.

७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मंत्रालय येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला. त्यावेळी शिंदे बोलत होते. गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने भरीव कामगिरी केली आहे. विदेशी गुंतवणूक, समाजातील दुर्बल, गोरगरीबांसाठी आखलेल्या नावीन्यपूर्ण योजना या माध्यमातून नागरिकांप्रती असणारी बांधिलकी दाखवून दिल्याचे प्रारंभीच स्पष्ट करून शिंदे यांनी देशाची अर्थव्यवस्था पाच लाख कोटी डॉलरची होण्यासाठी केंद्र सरकारचे जे प्रयत्न सुरू आहेत.

राज्यातील गुंतवणूकदार, उद्योजक किंवा सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम सरकारने केल्याचे सांगून शिंदे म्हणाले की, कृषी, शिक्षण, ऊर्जा, निर्मिती, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन, आरोग्य सुविधा, सेवा या क्षेत्रांमध्ये आपण आमूलाग्र क्रांती आणत आहोत.

# सरकारची लाडकी बहिण योजना कोरेगावच्या आमदारांची जहागिरी नाही

## धमकी देणाऱ्यांचा करेक्ट कार्यक्रम ऑक्टोबरमध्येच कार्यकर्ते करतील : आ. शशिकांत शिंदे

**कोरेगाव** : सरकारने जाहीर केलेल्या योजना जनतेच्या पैशातून दिल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे कोणी महाराष्ट्र शासनाच्या योजनांना स्वतःची जहागिरी समजू नये, असे नमूद करत आ. शशिकांत शिंदे यांनी यासंदर्भातील पत्रकात म्हटले आहे, की सरकारमधले महायुतीचे प्रत्येक नेते सध्या 'योजना मीच कशी आणली', हे सांगत फिरत आहेत. कोरेगावचे विद्यमान आमदार तर लाडकी बहीण योजना ही स्वतःची जहागीर समजून या योजनेतून नावे वगळण्याची धमकी देत आहेत. त्यांना सांगू इच्छितो, की ज्यांना धमक्या देत आहात, तेच कार्यकर्ते येणाऱ्या ऑक्टोबरमध्ये तुमचा करेक्ट कार्यक्रम करतील. गेल्या साडेतीन-चार वर्षांमध्ये अशाच पद्धतीच्या धमक्या देऊन, दबाव टाकून, खोटे कारनामे करूनच आपण काही लोकांना आपल्याकडे खेचण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. पण ज्या दिवशी आचारसंहिता लागेल आणि निवडणुकीचा रणसंग्राम सुरू होईल, त्यावेळी हे सगळे मोकळे होतील. कर्मचाऱ्यांपासून, कार्यकर्त्यांपासून जनतेचा उठाव झालेला तुम्हाला कोरेगाव मतदार संघात पाहायला मिळेल. अहंकार, गर्व जास्त काळ टिकत नाही, याची प्रचिती रावणाला देखील आली असल्याचे इतिहास सांगतो. तेच कोरेगाव मतदारसंघामध्ये देखील पाहायला मिळेल.येणाऱ्या निवडणुकीमध्ये पुढे पुढे पळणाऱ्या कार्यकर्त्यांचा डिसेंबर नंतर करेक्ट कार्यक्रम करू, असा दम पराभवाच्या भीतीपोटीच दिला आहे.



ऑक्टोबरमध्ये निवडणुकीमध्ये जनताच तुमचा करेक्ट कार्यक्रम करणार आहे. त्यामुळे पुढे भविष्यात तुम्हाला कार्यक्रम करण्याची संधीच मिळणार नाही. आजपर्यंत आम्ही आमचे जेष्ठ नेते शरद पवार यांच्या सुसंस्कृत विचारांमुळेच तुमच्याकडे दुर्लक्ष करत राहिलो होतो. कार्यकर्त्यांना धमक्या देऊन जनतेला नाहक त्रास देण्याचा प्रयत्न कराल, तर आम्ही जशास तसे उत्तर देऊ. सत्ता बदल होणारच असून, महाविकास आघाडीचीच सत्ता येणार असल्याने तुम्ही व तुमच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कुकर्माची सगळी चौकशी लावून येणाऱ्या काळात करेक्ट कार्यक्रम केला जाईल, असा इशारा आमदार शशिकांत शिंदे यांनी दिला. विकासाच्या नावाखाली ठेकेदारांना हाताशी धरून राज्याच्या तिजोरीची लूट केली असून, अवास्तव इस्टिमेट तयार करून पैसा लुटलेला आहे, त्याचीही चौकशी लावली जाईल आणि तुरुंगवास घडवून पैसे देखील वसूल करायला लावले जातील. त्यामुळे कोण कोणाचा करेक्ट कार्यक्रम करतोय, हे येणाऱ्या काळामध्ये दिसेलच. कार्यकर्त्यांना दमबाजी करून त्रास देण्याचा प्रयत्न कराल, तर गाठ आमच्याशी आहे. त्यामुळे उगीच आव्हाने देऊन ताकद दाखवण्याची भाषा कोणी करू नये. 'उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदावरून मीच काढले', हे सांगणारे तुम्हीच. आरक्षणावर आव्हानाची भाषा बोलता? खरे लाभार्थी बाजूला ठेवून खोटे लाभार्थी दाखवून आपण बऱ्याच जणांना लुटले असून, अगदी कोविड काळापासून आतापर्यंतच्या तुमच्या कारनाम्यांचा पर्दाफाश होणार असल्याने गद्दार व लुटारू कोण आहे, हे सत्य जनतेला समजणार आहे.

आमच्याकडे राहिलेले कार्यकर्ते बाजारू व विकाऊ नाहीत, तर ते निष्ठेने राहिलेले आहेत आणि तेच एकत्रितपणे लढतील आणि तुम्हाला तुमची जागा दाखवतील. आमच्या संयमाचा अंत पाहू नये, मी कार्यकर्त्यांच्या व जनतेच्या पाठिशी ठामपणे उभा आहे, असे आमदार शशिकांत शिंदे यांनी पत्रकात म्हटले आहे.

# जोशी हॉस्पिटल प्रा. लि., फलटण येथे इतिहास रचला

**फलटण** : ११० वर्षे वयाचे वृध्द गृहस्थ घरात पडल्याने त्यांच्या खुब्याचे हाड मोडून ४ तुकडे झाल्याने प्रचंड वेदना आणि अत्यंत भयग्रस्त स्थितीत वृध्द रुग्ण व नातेवाईक जोशी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले असताना डॉ. प्रसाद जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत धोका पत्करुन केलेली शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.



या रुग्णाचे हृदय वयोमानाप्रमाणे कमकुवत झाले होते, हाडे ठिसूळ झाली होती, मात्र कोणत्याही परिस्थितीत शस्त्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे असल्याने डॉ. जोशी यांनी निर्णय घेतला आणि शस्त्रक्रिया केली ती यशस्वी झाली. ग्रेड ५ नेस्थेसियाचा धोका पत्करुन शस्त्रक्रिया करण्यात आली. शल्य विशारद डॉ. प्रसाद जोशी आणि ईशान गजबे,फिजिशियन डॉ. महेश कोकणे पाटील, नेस्थेटिस्ट डॉ. शरद धायगुडे यांच्यासह टीम सदस्यांचे आभार रुग्णाचे नातेवाईकांनी मानले आहेत. डॉ. प्राची जोशी, डॉ. श्रीवल्लभ कुलकर्णी, ऑपेरेशन थिएटर मधील सहकारी संदीप पवार, नितीन जगताप, मंगेश बोडरे, प्रशांत सोनवलकर, ह्रिळे मोहन पवार, पूजा कान्हेरे आणि नर्सिंग स्टाफ यांनी खूप मेहनत घेतली. हे दिव्य उत्तमरित्या पार पाडण्यात संपूर्ण टीमच्या सामूहिक प्रयत्नांचा समावेश असल्याचे नमूद केले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# डॉ. शंतनू अभ्यंकर यांचे निधन



**सातारा :** येथील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक, लेखक आणि नास्तिकतावादी चळवळीचे बिनीचे शिलेदार डॉ. शंतनू शरद अभ्यंकर (वय ६०) यांचे गुरुवारी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे आई-वडील, पत्नी, भाऊ, एक मुलगा एक विवाहित मुलगी असा परिवार आहे.

डॉ. अभ्यंकर यांची सातारा जिल्ह्यातील प्रख्यात स्त्री रोगतज्ञ, वक्ता, नाटककार, सामाजिक जाणीव असलेले विज्ञानवादी कार्यकर्ता म्हणून देखील सर्वत्र ओळख होती. वाई येथील प्राज्ञ पाठ शाळा मंडळाचे ते विश्वस्त तर लोकमान्य टिळक स्मारक संस्थेचे अध्यक्ष होते.

पुणे येथील बी जे वैद्यकीय महाविद्यालयातून डॉ. अभ्यंकर यांनी स्त्रीरोग आणि प्रसूतीशास्त्र या विषयात पदव्युत्तर पदवी संपादन केली होती. १९९७ पासून ते वाई येथील त्यांच्या वडिलोपार्जित 'मॉडर्न क्लिनिक' या व्यवसायातून वैद्यकीय सेवा देत होते. स्त्रीआरोग्य तज्ज्ञांच्या राष्ट्रीय काम विज्ञान समितीचे ते सचिव होते. अनेक राष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी स्त्री आरोग्य विषयांवर आपले विचार मांडले.

वाई येथील प्राज्ञपाठशाळा मंडळाचे विश्वस्त होते. तेथील अनेक प्रकल्पांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. लोकमान्य टिळक स्मारक संस्थेचे ते अध्यक्ष होते. वसंत व्याख्यानमाला आणि प्रतीक थियटरचे ते माजी अध्यक्ष होते. लेखक म्हणूनही डॉ. अभ्यंकर प्रसिद्ध होते. याशिवाय विविध वृत्तपत्रे, नियतकालिके, समाज माध्यमांवरही ते सातत्याने लेखन करत होते.

दोन वर्षांपासून डॉ. अभ्यंकर हे आजाराशी लढत होते. या अंतर्गतच पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी गर्दी झाली होती. रात्री उशिरा कृष्णातरी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. अभ्यंकर यांनी मृत्यूपश्चात अवयव आणि पेशीदान केले आहे.

# विंटेज गाड्यांच्या रॅलीची सातारकरांना भुरळ

## शाहू कला मंदिर परिसरात जुन्या गाड्यांचे प्रदर्शन




**सातारा :** विंटेज कार क्लब ऑफ सातारा यांचे वतीने साताऱ्यातील शाहू कला मंदिर परिसरामध्ये विंटेज गाड्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये जुन्या काळातील सुमारे वीस हून अधिक गाड्यांचा सहभाग होता विंटेज कार क्लबचे संयोजक प्रज्वल दुदुस्कर, आदित्य भोसले यांनी या रॅलीचे प्रदर्शन केले होते स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित या कार प्रदर्शनाला सातारकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पुरातन गाड्या आणि बाईक यांची शोभा दर्शवणारे एक अनोखे संमेलन साताऱ्यात आयोजित करण्यामागे या गाड्यांची माहिती आजच्या पिढीला व्हावी तसेच या वाहनांनी एकेकाळी एका पिढीला मोहिनी घातली होती या विविध दशकातील विंटेज कार आणि बाईक आणि त्याचे तंत्रज्ञान त्याची रचना कौशल्य सातारकरांना कळावे याकरता या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याचे प्रज्वल दुदुस्कर यांनी सांगितले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त दिवसभर चाललेल्या या संमेलनामध्ये अनेक दुर्मिळ आणि पुरातन गाड्यांचे प्रदर्शन करण्यात आले यामध्ये फोर्ड, रॉयल एनफिल्ड बुलेट, फाईव्ह हंड्रेड जीप, राजदूत जावा, लॅम्ब्रेटा, यासारख्या गाड्या आकर्षणाचे केंद्र ठरल्या. या गाड्यांच्या रचनेतून तत्कालीन काळातील अभियांत्रिकी कौशल्य आणि तंत्रज्ञानाची झलक पहावयाला मिळाली या संमेलनात सहभागी झालेले अनेक उत्साही मालकांनी आपल्या गाड्या आणि बाईकच्या देखभालीच्या कथा सांगितल्या या संमेलनाने केवळ गाड्यांच्या प्रेमींची अपेक्षांची पूर्ती केली.

या गाड्यांच्या प्रदर्शनाला सातारकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला विशेषतः फोर्ड कंपनीच्या जुन्या गाड्यांचे मॉडेल्स विशेष लक्षवेधी ठरले या संमेलनाचे आयोजन पुढील वर्षी सुद्धा करण्यात येणार आहे ज्यादा आणखी काही दुर्मिळ गाड्या आणि बाईक ठेवण्यात येणार आहेत वाहन प्रेमींसाठी ही एक उत्तम संधी असून त्यातून त्यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देणे शक्य होणार आहे अशा विंटेज वाहन प्रेमींनी विंटेज कार क्लब ऑफ सातारा यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्रज्वल दुदुस्कर व आदित्य भोसले यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या संयोजनात आकाश भोसले, अजिंक्य भोसले, मुस्तफा शेख यांनी विशेष सहकार्य दिले.

# रानभाजी महोत्सवाला आमदार शिवेंद्रसिंहराजे यांची भेट



**सातारा :** रानभाज्या व रानफळांचे आरोग्यविषयक महत्त्व यांची माहिती ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना व्हावी, याकरिता पोलीस करमणूक केंद्र, सातारा येथे जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाला उपस्थित राहून येथील स्टॉल्सना आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी भेट दिली आणि रानभाज्या व रानफळांची माहिती घेतली.

या महोत्सवात रानभाज्यांचे २१ स्टॉल सहभागी झाले होते. सातारा जिल्हयात दुर्मिळ व पौष्टिक रानभाज्या अस्तित्वात आहेत. त्याची माहिती सातारकरांना होण्यासाठी असे रानभाजी महोत्सव आयोजित व्हायला हवेत अशी प्रतिक्रिया आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक बंधू-भगिनी उपस्थित होते.

# हॉटेल व्यावसायिक दत्तात्रय कुंडलिक यांना महाराष्ट्र उद्योग सन्मान पुरस्कार




**रांजणगाव :** सरदवाडी,ता. शिरुर येथील हॉटेल व्यावसायिक दत्तात्रय लक्ष्मण कुंडलिक यांना नुकताच महाराष्ट्र उद्योग सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

पुणे येथे नुकतेच स्विफ्ट अन् लिफ्ट यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच उद्योगात गगनभरारी घेणाऱ्या यशस्वी उद्योजकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शिरूर तालुक्यात विजय हिंदू या नावाने कुंडलिक यांचे हॉटेल असून येथील भेळ ही सातासमुद्रापार गेली आहे. राज्यातील अनेक राजकीय नेते पुणे नगर महामार्गावर जात असताना नेहमी येथील भेळीचा आस्वाद घेतात.तर परदेशात ही भेळ मागणीनुसार पाठवली जात आहे. पिंपरी चिंचवड येथे प्रसिद्ध अभिनेत्री उर्मिला कोठारे यांच्या हस्ते दत्तात्रय कुंडलिक व निखील कुंडलिक यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून महाराष्ट्र उद्योग सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी मोठ्या संख्येने राज्यभरातून उद्योजक उपस्थित होते.

# सर्व्हिस रोडवर पडलेला खड्डा वाहनाचालकासाठी ठरतोय जीवघेणी

**लिंब :** सातारा पुणे राष्ट्रीय महामार्गावरील गौरीशंकर लिंब कॅम्पस समोरील सर्व्हिस रोडवर मोठा खड्डा हा अपघाताला नियंत्रण देत आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची ये जा असल्याने हा पडलेला मोठा खड्डा राष्ट्रीय महामार्ग रस्ता सुरक्षित विभागाने मुजवावा अशी मागणी वाहन चालकांकडून होत आहे. पडलेल्या मोठ्या खड्ड्यात पाणी साचल्याने रात्रीच्यावेळी वाहन चालकांना हा खड्डा दिसून येत नाही परिणामी या खड्ड्यात वाहने आदळून वाहनांच्या नुकसानी बरोबरच वाहन चालकांना दुखापतीला सामोरे जावे लागत आहे. रात्री या परिसरात अंधाराचे साम्राज्य असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे .

राष्ट्रीय रस्ता सुरक्षित महामार्ग यंत्रणेची झालेली दुर्लक्ष वाहन चालकांसाठी जीवघेणे ठरत आहे . रस्ता अपघाताचे वाढते प्रमाण पाहता



सर्व्हिस रोडवरील पडलेला मोठा खड्डा त्वरित मुजवून वाहन चालकांना दिलासा दयावा.

खराब रस्ते पण टोलमात्र सक्तीने वसूल करणार्या यंत्रणेला रस्त्यावर पडलेले खड्डे दिसत नाहीत का? असा संतापजनक प्रश्न नागरिक व वाहन चालक संबंधितांना विचारत आहेत पण याकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करून वाहन चालकांकडून टोल वसुली करीत आहे.

# रोहितमुळे जिल्ह्याचे भवितव्य सुरक्षित वाटते : खा. विशाल पाटील



**तासगांव :** शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेऊन तासगांवात आयोजित करण्यात आलेले कृषीहित प्रदर्शन शेतकऱ्यांना उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन खासदार विशाल पाटील यांनी केले. कै. वसंतरावदादा पाटील घराण्याचे अस्तित्व जिवंत ठेवण्याचे काम आबा कुटुंबियांनी केले असून ते आम्ही कधीही विसरू शकणार नाही असे ही खासदार पाटील यावेळी बोलून दाखवले.

तासगांव सांगली रोडवर दत्त मंदिर ग्राऊंड, दत्तमाळ येथे स्व.आर.आर. (आबा) पाटील यांच्या जयंतीनिमित्त युवानेते रोहित पाटील यांच्या संकल्पनेतून सलग दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या कृषीहित प्रदर्शनाचे उद्घाटन खा. विशाल पाटील यांच्या हस्ते झाले याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आ. सुमन पाटील, जगन्नाथ मस्के,.जि.म. बँकेचे संचालक सुरेश पाटील, हणमंतराव देशमुख, महांकाली साखर कारखान्याच्या अध्यक्ष अनिता सगरे, हणमंतराव देसाई, बाळासाहेब पाटील, राजाराम पाटील, स्मिता पाटील, तालुका कृषी अधिकारी सर्जे राव अमृतसागर, आदी उपस्थित होते.

तासगांव तालुक्यात आज विविध योजनेतून पाणी आले असून याचे श्रेय हे अंजनीकर आबा कुटुंबियांचे आहे असे सांगून खा. विशाल पाटील म्हणाले, शेतात पाणी आले त्या पाण्यातून शेतात नवनविन वेगवेगळी पिके कशी घेता येतील यासाठी रोहितदादा पाटील यांनी आयोजित केलेले हे कृषीहित प्रदर्शन शेतकऱ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल असे सांगितले.

रोहितदादांच्याकडे पाहून जिल्हयाचे भवितव्य सुरक्षित आहे असे वाटते : खा. विशाल पाटील.

यावेळी बोलताना खा. विशाल पाटील म्हणाले, रोहित पाटील यांना तुम्ही आमदार कराल पण रोहित दादाच्या झालेल्या प्रचारसभा, पदयात्रा यामुळे खूप खासदार झाले आहेत. आबा कुटुंबियांचे आणि दादा कुटुंबियांचे संबध खूप वेगळे आहेत. फार कमी वयात रोहित खूप मोठी जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांच्या कडे पाहून सांगली जिल्हयाचे भवितव्य सुरक्षित आहे असे वाटते असे स्पष्ट करून आबा कुटुंबियांनी कधीच कोणाला उपाशी पाठवलेले नाही असे ही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना युवानेते रोहित पाटील यांनी सलग दुसऱ्या वर्षी आयोजित केलेल्या कृषीहित प्रदर्शनाचे उद्घाटन झाल्याचे जाहिर केले. तालुक्यातील पाणी योजना मार्गी लावून दुष्काळी तासगांव तालुका हा राज्याच्या नकाशावरील शब्द पुसण्याचे काम आबांनी केले. तरूणांच्यासाठी आयोजित कौशल्य विकास उत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे सांगून शाश्वत विकासाचे पाऊल उचलले जात आहे. कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी कृषीभवन उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगून शालेय पोषण आहारात बेदाण्याचा वापर व्हावा हा निर्णय देशपातळीवर व्हावा असे ही रोहित पाटील यांनी बोलून दाखवले.

यावेळी बाजार समिती सभापती युवराज पाटील, रविंद्र पाटील, अजित जाधव, डी.ए. माने, ॲड. गजानन खुजट, अमोल पाटील, प्रा. जी. के. पाटील, संजय पाटील, अमित पाटील , खंडू कदम, सर्जेराव पाटील, सौ. नलिनीताई पवार, सौ.शुभांगी साळुंखे,पूनम माळी, संध्याराणी मंडले, सत्वशिला पाटील, आदी उपस्थित होते.

# क्राईम

## एमआयडीसी परिसरातून दुचाकीची चोरी

**सातारा :** एमआयडीसी परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा एमआयडीसी परिसरातून अज्ञात चोरट्याने एमएच ११ बीवाय ७४७२ या क्रमांकाची दुचाकी चोरुन नेली. याप्रकरणी संजय लक्ष्मण गोसावी (वय ५४, रा. एमआयडीसी, सातारा) यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. ८ ऑगस्ट रोजी घडली आहे.

## अपघात प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** अपघात करुन एका महिलेस जखमी केल्याप्रकरणी एकाविरोधात शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, शाहूपुरी चौकात अपघात झाल्याप्रकरणी शोएब तांबोळी (रा. मंगळवार पेठ, सातारा) याच्या विरुध्द शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दि. २४ जुलै रोजी अपघात झाला असून अपघात प्रकरणी महिलेने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. दोन दुचाकींचा अपघात होवून तक्रारदार महिलेला दुखापत झाली व दुचाकीचे नुकसान झाले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**सातारा :** सातारा शहर परिसरातून अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलिस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, शाहूपुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केले असल्याची तक्रार शाहूपुरी पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. मुलगी १६ वर्षाची असून ही घटना दि. १५ ऑगस्ट रोजी घडली आहे.

## सिव्हिल हॉस्पिटलमध्ये चोरी करणाऱ्या विरोधात गुन्हा

**सातारा :** सिव्हिल हॉस्पिटल मध्ये चोरी करणाऱ्या चोरट्या विरोधात सातारा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास सौद अहमद खान रा. शाहूनगर, गोडोली, सातारा हा सिव्हिल हॉस्पिटल, सातारा येथील पीएम रूम येथे अंदाजे आठ हजार रुपये किंमतीच्या दोन हायड्रोलिक कॉट चोरताना आढळून आला. अधिक तपास पोलीस हवालदार मेचकर करीत आहेत.

## आईस मारहाण केल्याप्रकरणी मुलावर गुन्हा

**सातारा :** आईस मारहाण केल्याप्रकरणी मुलाविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास संगीता अशोक नलवडे राहणार मंगळवार पेठ सातारा या राहत्या घरात झोपलेले असताना त्यांचा मुलगा मयूर अशोक नलवडे हा दारू पिऊन आला. घरात आल्यानंतर त्याने संगीता नलावडे यांना शिवीगाळ करत त्यांना दगडाने मारहाण केली. तसेच जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी दिली असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस हवालदार वाघ करीत आहेत.

## मारहाण करुन नुकसान केल्याप्रकरणी एकाविरोधात गुन्हा

**सातारा :** जुन्या वादाच्या कारणातून किराणा दुकानदाराला काठीने मारहाण करत दुकानातील साहित्याची तोडफोड केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, नामदेव नानू राठोड (रा.म्हसवे ता.सातारा) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी रामदास रेबु राठोड (वय ५५, रा. म्हसवे) यांनी सातारा तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार द्या : सत्यवान कमाने

## जनता क्रांती दलाची गोंदवले ते दहिवडी बाईक रॅली : प्रांताधिकारी यांना दिले निवेदन



**जनता क्रांती दलाच्या वतीने गोंदवले ते दहिवडी बाईक रॅली काढण्यात आली. दुसऱ्या छायाचित्रात प्रांताधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देण्यात आले. ( छाया : आकाश यादव )**

**वडूज :** या जगामध्ये अनेक प्रकार साहित्यिकांचे आहेत ज्यामध्ये काही साहित्यिक रडायला शिकवते तर काही साहित्यिक हसायला शिकवते पण जे साहित्यिक लढायला शिकवते ते साहित्यिक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना शासनाने भारतरत्न पुरस्कार द्यावा अशी मागणी जनता क्रांती दलाच्या वतीने करण्यात आली.

आज गोंदवले ते दहिवडी मध्ये बाईक रॅली काढून प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात आले याप्रसंगी जनता क्रांती दलाचे अध्यक्ष सत्यवान कमाने बोलत होते. यावेळी चंद्रकांत अवघडे, अड संतोष कमाने, कमलेश आवळे , सामजिक कार्यकर्ते विजय शिंदे, आनंदा साठे, दत्ता केंगारे, दाऊदखान मुल्ला, महादेव सकट, सोमनाथ खुडे, सतीश अवघडे, चैतन्य अवघडे, रोहित अवघडे, रोहन अवघडे, विकास सकट, अजित साठे, सोहेल मुलाणी , संतोष यादव, नाथा तुपे, योगेश माने, दत्ता अवघडे, अर्जुन यादव, रमेश यादव, तानाजी भोंडवे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना कमाने म्हणाले आज अण्णाभाऊ साठे यांनी व्यापक स्वरूपात व वास्तव सवरुपात साहित्य लिहले . आज महाराष्ट्रातील जवळजवळ अनेक जाती ज्या शासनाकडे नोंदी ही नाहीत तरी यावर अण्णाभाऊंनी साहित्य लिहिले आणि त्यांना न्याय द्यायचं काम केलं आहे. तसेच अण्णाभाऊंनी दलीत, सोशीत, कष्टकरी कामगार यांच्या व्यथा मांडून साहित्य लिहला आणि जे जगासमोर आणले त्यांना हे शासन त्यांना भारतरत्न पुरस्कारांपासून उपेक्षित ठेवत आहे ही बाब निषेधार्थ आहे.

प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेनातील अधिक माहिती अशी .संपूर्ण भारत देशा बरोबर जगभर अण्णाभाऊंचे अनुयायी असून त्यांच्या जयंतीनिमित्त वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात.

त्यांच्या लेखनीवर वेगवेगळे संशोधन झालेले आहे विवीध पाठ्यपुस्तकात त्यांचे साहित्य आभ्यासले जाते,वास्तववादी साहित्य लिहताना त्यांनी कामगार व भांडवलदार यांच्यातली संघर्ष दलितांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर प्रेरित होऊन जगबदलासाठी दिलेली हाक तर पृथ्वी हि शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती दलित कामगार कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे हे जगाला ठणकावून सांगत त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य लोकासाठीच घालवले. अण्णाभाऊ साठे यांना माणसं खूप आवडायची अशा या महामानवाला मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात यावे यासाठीच्या लोकभावनेचा व त्यांच्या वैश्विक साहित्यिचा आदर केंद्र व राज्य सरकारने करून त्यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा. अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी विजय शिंदे, दाऊद मुल्ला, महादेव सकट ,चंद्रकांत अवघडे, संतोष कमाने, सतीश अवघडे यांनी मनोगते व्यक्त केली.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्यावतीने २२५ वृक्षांचे वृक्षारोपण

## डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे समाजसेवेचे व्रत अलौकिक : शामकांत शेडगे

**सातारा** : डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा ता. अलिबाग जि. रायगड यांच्यावतीने पर्यावरणाचे रक्षण,संवर्धन यासाठी पदमश्री सन्मानित महाराष्ट्र भूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, रायगडभूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी, राहुल धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (११ ऑगस्ट) रोजी सज्जनगड पायथा ते सज्जनगड रस्ता मार्ग परिसर तसेच सातारा मेढा रस्त्यावरील हिरापूर फाटा ते नुने ता. सातारा रस्ता मार्ग आदी ठिकाणी एकूण दोनशे पंचवीस वृक्षांचे वृक्षारोपन साडेपाचशे सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

सज्जनगड पायथा वृक्षारोपणप्रसंगी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने स्वीकारलेले समाजसेवेचे व्रत कौतुकास्पद अलौकीक असुन वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन काळाची गरज आहे असे प्रतिपादन सातारा जिल्हा कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे यांनी केले. दरम्यान रामदासस्वामी संस्थान सज्जनगड सेवेकरी पंकज पंडित, सुरज काळे, परळी सरपंच बाळासाहेब पाटील, सोनवडी सरपंच अंकुश कारंडे, गजवडी सरपंच सुनील बल्लाळ, गजवडी उपसरपंच धनाजी कदम, सोनवडी उपसरपंच महेश कदम, सोनवडी गजवडी विकास सेवा सोसायटी उपचेअरमन दीपक कदम, ग्रामपंचायत सदस्य सचिन बळीप, सुमित गोळे, मुख्याध्यापक रंगराव देशमुख महाविद्यालय आंबवडे बुद्रुक, रघुनाथ जाधव तसेच सातारा मेढा रस्त्यावरील हिरापूर फाटा ते नुने ता.सातारा रस्तामार्ग वृक्षारोपणप्रसंगी नुने ता. सातारा सरपंच जयश्री मोरे,उपसरपंच सुमन चोरगे,माजी सरपंच अनिल कुर्लेकर,रोहिणी बनकर, सामाजिक कार्यकर्ते रणजीत संकपाळ, सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा प्रशांत माने,राहुल थोरात, ग्रामस्थ,प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.




वृक्षारोपण करताना धर्माधिकारी प्रतिष्ठानचे पदाधिकारी.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या तुकोबारायांच्या वचनानुसार वृक्षच पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्वपुर्ण कार्य करीत आलेले असुन प्रतिष्ठानच्या माध्यमातुन पर्यावरणाच्या रक्षणासाठी सामाजिक स्वच्छतेसोबतच वृक्षारोपन,वृक्षसंवर्धन करून सामाजिक बांधिलकी जपण्यात येत आहे. मानवाला जगण्यासाठी प्राणवायुचे उत्सर्जन; अन्न, वस्त्र, निवारा, औषध, मुलभुत गरजांची उपलब्धता; पावसाला पृथ्वीकडे आकर्षित करण्याचे कार्य वृक्षच करतात. वृक्षांची संख्या कमी होत असल्याने मानवी जीवनावर दुष्परिणाम, ऋतुचकावर अनिष्ट परिणाम होऊन पाऊस नियमितपणे पडत नाही; काही ठिकाणी दुष्काळाची परिस्थिती तर काही ठिकाणी नदयांना अचानक महापुर तसेच औष्णिकस्तर वाढू लागल्याने वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन हे आपले उत्तरदायित्व आहे. यामुळे स्वयंस्फुर्तीने वृक्षलागवड करण्याचे कार्य प्रतिष्ठानच्या माध्यमातुन होत असुन समाजासमोर आदर्श उभा राहत आहे.

वृक्षारोपन करून विश्वसेवा, राष्ट्रसेवा, मानवजातीची अंशिक सेवा करून सृष्टीच्या ऋणातुन आंशिक मुक्तता मिळविण्यासाठी वृक्षलागवड महत्वाची आहे. वृक्षलागवडीबरोबरच त्यांचे संगोपन महत्वपुर्ण आहे.प्रतिष्ठानच्या माध्यमातुन जिल्ह्यात यापुर्वीच्या हजारो वृक्षांचे संगोपन अत्यंत नियोजनपुर्वक केले जात असुन या सामाजिक चळवळीत नागरिकांचा उत्स्फुर्त सहभाग आहे. आंबा, वड, पिंपळ, जांभूळ, करंज, चिक्कू,पेरू, आदी विविधप्रकारची जंगली झाडे,फळझाडे लावून प्रतिष्ठानच्या माध्यमातुन संगोपन केले जाणार आहे. जिल्हाभर विविध ठिकाणी आपापल्या परिसरात सदस्यांकडून वृक्षारोपन करण्यात आले. या वृक्षचळवळीमध्ये वाई, किकली, अनवडी, कुडाळ, मेढा, प्रभुचीवाडी, सातारा, सातारारोड, अंबवडे, कोरेगाव, नहरवाडी, नांदगाव, कराड, धोंडेवाडी, पाटण, नारळवाडी, मारूल हवेली, वडूज, निमसोड, खातगुण, पुसेगाव, बुध, म्हसवड, पिलीव (सोलापुर) आदी बैठकीतील व परिसरातील सदस्य उपस्थित होते.

> “ प्रतिष्ठानचे कार्य अलौकिक व वाखाणण्याजोगे असून गेल्या ८० वर्षाहून अधिक काळ समाजाला मार्गदर्शन व दिशा देणारे अनेक उपक्रम राबवले जात आहेत. स्वच्छता अभियान, रक्तदानासह अनेकविध समाजहितपयोगी उपक्रमातून समाजाला आदर्श घडवून दिला जात आहे.निरपेक्ष भूमिकेतून उपलब्ध मनुष्यबळ पाहता केवळ वृक्षारोपणच नव्हे तर वृक्षसंगोपन यंत्रणादेखील मजबुत आहे.
>
> श्यामकांत शेडगे,अधीक्षक,जिल्हा कारागृह

> “ **वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धनाचे महत्वपुर्ण कार्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत असून माणसांमध्ये बदल घडविणे,विचारांमध्ये सुधारणा करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे.**
>
> **बाळासाहेब पाटील, सरपंच,परळी.**

> “ नुने गावच्या हद्दीत श्री समर्थ बैठक हॉलमुळे आमच्या नुने गावचा लौकीक संपुर्ण महाराष्ट्रभर झाल्याचा आम्हाला आनंद आहे असून असे वैभव,भूषण लाभणे अत्यंत कठीण असते.वृक्षसंगोपनाची जबाबदारी सदस्यांसह आम्हीदेखील स्वीकारून पंचक्रोशीतून आम्हा सर्व ग्रामस्थांचे नेहमीच आपणास सहकार्य लाभेल.
>
> अनिल कुर्लेकर,माजी सरपंच नुने ता. सातारा

## फलटणमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉकी स्ट्रोटर्फ मैदान करणार : आ. रामराजे नाईक- निंबाळकर

**फलटण** : फलटणमध्ये हॉकीचा आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावा याकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉकी स्ट्रोटर्फ मैदान फलटण येथे निर्माण करण्याबाबत पूर्णतः सहकार्य करण्याचे आश्वासन आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी दिले आहे.

हॉकी इंडिया अंतर्गत हॉकी महाराष्ट्र यांच्या मान्यतेने दि हॉकी सातारा संघटना आणि मुधोजी हायस्कूल व कनिष्ठ महविद्यालय, फलटणच्या ५ महिला खेळाडू कु. अनुष्का चव्हाण, कु. अनुष्का केंजळे, कु. श्रेया चव्हाण कु. निकिता वेताळ व कु. तेजस्विनी कर्वे यांनी सुरत येथील राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करीत पहिल्या वेस्ट झोन महिला हॉकी चॅम्पियनशिप स्पर्धामध्ये मिळालेल्या संधीचे सोने करत उत्कृष्ट खेळाद्वारे पहिल्या वेस्ट झोन महिला हॉकी स्पर्धेमध्ये ब्रांझ पथक प्राप्त केल्याबद्दल या खेळाडू व त्यांचे प्रशिक्षक यांचे लक्ष्मीविलास पॅलेस या निवास स्थानी खास अभिनंदन व सत्कार करताना आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर बोलत होते.

आगामी काळात फलटणसह संपूर्ण सातारा जिल्ह्यातील हॉकी खेळाडूंना स्ट्रोटर्फ मैदानावर सराव करण्याची संधी प्राप्त होऊन आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्यास मदत होईल, असा विश्वास आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केला आहे.

या खेळाडूंनी सातारा जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रामध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला असल्याची माहिती देत दि हॉकी सातारा संघटनेचे सचिव तथा ज्येष्ठ हॉकी प्रशिक्षक निवृत्त तालुका क्रिडा अधिकारी महेश खुटाळे यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले. दि हॉकी सातारा संघटना सचिव तथा ज्येष्ठ हॉकी प्रशिक्षक महेश खुटाळे, हॉकी प्रशिक्षक सचिन धुमाळ या खेळाडूंना प्रशिक्षण देत असून प्रशिक्षणामध्ये सहाय्यक म्हणून बी. बी. खुरंगे यांचे उत्तम सहकार्य लाभत आहे. सर्व प्रशिक्षक व खेळाडू यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी आ. श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर, आ. दीपकराव चव्हाण, फलटण एज्युकेशन सोसायटी नियामक मंडळ चेअरमन श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबालकर, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर, मुधोजी हायस्कूलचे प्राचार्य सुधीर अहीवळे, दि हॉकी सातारा संघटना अध्यक्ष बाहुबली शहा, उपाध्यक्ष सचिन लाळगे, खजिनदार पंकज पवार, सदस्य प्रवीण गाडे, महेंद्र जाधव, माजी राष्ट्रीय खेळाडू शिरीष वेलणकर, सुजीत निंबाळकर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## खवाडा, बबन या यशस्वी चित्रपटांचे दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांच्याकडून माणदेशची पाहणी

**मायणी** : ख्वाडा, बबन, हैद्राबाद कस्टडी,टीडीएम या यशस्वी चित्रपटांचे दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे हे आता 'फकिरा 'या नव्या चित्रपटाची निर्मिती करत आहेत. त्यासाठी त्यांना अस्सल ग्रामीण लोकेशन आवश्यक असल्याने त्यांनी नुकतीच खटाव -माण भागातील उंच सखल पठारे, व टेकड्यांची पाहणी केली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची फकिरा ही १९५९ साली प्रकाशित झालेली कादंबरी सर्वांना परिचित आहे. फकिरा या मातंग समाजातील तरुणाच्या आयुष्यावर बेतलेल्या या कादंबरीने त्या काळात सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या फकिराच्या कहाणीने सगळ्यांना आपलेस केले.

त्यामुळे ती कादंबरी प्रचंड गाजली. आजही अनेकजण ही कादंबरी आवर्जून वाचतात. फकिराची हीच गोष्ट आता प्रेक्षकांना रुपेरी पडदयावर पाहायला मिळणार आहे.य ाबद्दल दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांनी घोषणा केली आहे.



**दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे याच्या माणदेशी पाहणी दरम्यान लेखक बाळासाहेब कांबळे व पत्नी यांनी सन्मान केला (छाया : स्वप्नील कांबळे)**

# बोंडारवाडी प्रकल्पाला मान्यता देणार : देवेंद्र फडणवीस

### विधानसभेपूर्वी प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही

**मेढा** : जावळी तालुक्यातील ५४ गावांसाठी बोंडारवाडी धरणाचा प्रश्न मार्गी लागणे आवश्यक आहे. या प्रकल्पासाठी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार हे सर्वसामान्य जनतेचे सरकार म्हणून काम करत आहे. विधानसभा निवडणुकीआधी बोंडारवाडी प्रकल्पास राज्य सरकार मान्यता देईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सातारा येथे एका कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री फडणवीस आले असता आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या उपस्थितीत धरण कृती समितीच्या सदस्यांनी त्यांची भेट घेतली. त्या वेळी कृती समितीशी संवाद साधताना फडणवीस बोलत होते.

फडणवीस म्हणाले, या प्रकल्पासाठी आमदार शिवेंद्रसिंहराजे सातत्याने पाठपुरावा करत आहेत. आमदार शिवेंद्रसिंहराजे जी कामे सांगतात ती सरकारच्या वतीने मार्गी लावली जातात. त्यामुळे जावळी तालुक्यातील हा महत्त्वाचा प्रश्न विधानसभा निवडणुकीच्या आधी निश्चित मार्गी लावला जाईल. यावेळी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हा बँकेचे संचालक ज्ञानदेव रांजणे, कृती समितीचे आदिनाथ ओंबळे, विलास शिर्के, श्रीरंग बैलकर, राजू जाधव, सुरेश कासुर्डे, बजरंग चौधरी, सागर धनावडे यांच्यासह कृती समितीचे सभासद उपस्थित होते. आमदार शिवेंद्रसिंहराजे यांच्या माध्यमातून हा प्रकल्प विधानसभा निवडणुकीपूर्वी निश्चित मार्गी लागेल, असा विश्वास जिल्हा बँकेचे संचालक रांजणे यांनी यावेळी व्यक्त केला.



**देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोंडारवाडी प्रकल्पासंदर्भात चर्चा करताना शिवेंद्रसिंहराजे भोसले. त्या वेळी ज्ञानदेव रांजणे, आदिनाथ ओंबळे, सागर धनावडे, श्रीरंग बैलकर व कृती समितीचे सभासद.**

# वडिलांचे स्वप्न लेकाने केले साकार

**गोंदवले** : कोरोना काळात वडिलांच निधन झाले असतानाही त्याने कुटुंबाची जबाबदारी स्वतःच्या अंगावर घेत आपला संघर्ष चालू ठेवला, अन वडिलांचे स्वप्न साकार केले ते म्हणजे वावरहिरेच्या ओंकार गोपट सावंत या जिद्दी लेकाने.

ध्येय गाठण्यासाठी जिद्दीला परिश्रम व योग्य नियोजनाची जोड दिली की, यश हे आपोआप आपल्या पायाशी लोळण घालू लागते. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे वावरहिरे, ता. माण येथील ओंकार पोपट सावंत हा होय. त्याने नुकत्याच राज्यात जाहीर झालेल्या पोलिस भरतीमध्ये दोन ठिकाणी व जिल्हा सत्र न्यायालय शिपाई पदाला गवसणी घातली. अनेक अडचणींवर त्यांनी मात करून हे यश संपादन केले.

कुणाचेही पाठबळ नसताना ओंकारने फक्त चिकाटी व पाच -सहा वर्षांच्या अथक परिश्रमाच्या जोरावर खाकी वर्दीच वडिलांचे स्वप्न साकार केले. ओंकारने शिपाई पदासाठी सातारा व दौंड या दोन ठिकाणी अर्ज दाखल केले होते. तो दोन्ही ठिकाणी चांगल्या गुणांनी शारिरीक चाचणी व लेखी परिक्षा उत्तीर्ण होत निवड चाचणीत पात्र ठरला. त्याचबरोबर त्याने जिल्हा सत्र न्यायालयाच्या शिपाई पदालाही गवसणी घालत एकाच वेळी तिहेरी यश संपादन केले. खडतर परिस्थितीवर मात करत मिळविले यश ओंकारच्या घरात आजी, आई, मोठा भाऊ,दोन बहिणी असे एकुण सहा सदस्याचे कुटुंब.घरची परिस्थिती बेताची. कोरोना काळात वडिलांचे निधन झाले. त्यामुळे मोठा भाऊ आणि आईवर कुटुंबाची जबाबदारी आली.आई व मोठा भाऊ मिळेल ते काम करत कुटुंबाचा गाढा चालवतात. ओंकारही आपले ध्येय पुर्ण करण्यासाठी स्वयंरोजगार करत कुटुंबाला आधार देत शिक्षण त्या मिळेल वेळेत पोलिस भरती व स्पर्धा परिक्षाची तयारी करत होता. घरची परिस्थिती बदलणे आणि वडिलांचे स्वप्न सत्यात उतरवणे यासाठी त्याने मागील पाच-सहा वर्षांपासून सातत्याने अपार परिश्रम घेतले. पहिल्या तीन-चार प्रयत्नांमध्ये त्याला अपयश येऊनही खचून न जाता आपली परिस्थिती बदलण्यासाठी तो झगडत राहिला. आई- वडिलांचे स्वप्न सत्यात उतरवायचे हाच विचार डोक्यात घेऊन खडतर परिश्रमाच्या आधारे त्याने हे यश मिळवले.



> **तर तुम्हास यश हमखास मिळतेच**
>
> **प्रथम माझ्या या यशाचे संपूर्ण श्रेय परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित करतो. त्यांनी स्वत:ला झिजवल्यामुळेच आज आमच्या नशिबी हे सोन्याचे दिवस आले आहेत. माझ्या कुटुंबियांनी व मित्रपरिवाराने मला माझ्या संघर्षाच्या काळात मोलाची साथ दिली. जिद्द,चिकाटी,संयम आणि प्रामाणिक प्रयत्न असतील तर यश तुम्हास हमखास मिळतेच.**
>
> **- ओंकार पोपट सावंत-वावरहिरे. ता.माण**

## महिलांनी तयार केल्या राख्या

**सातारा** : कारागृहातील महिला बंद्यांच्या हाताला काम मिळावे या उदात्त धोरणाने आणि विचारणे पुणे विभागाच्या कारागृह उपमहानिरीक्षक, स्वाती साठे यांनी संकल्पनेतून आणि माणदेशी फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा यांच्या सहकार्याने सातारा कारागृहातील महिला बंद्यांना सुबक व आकर्षक राखी तयार केल्या आहेत. आहे. ह्या राख्या महिलांनी खरेदी करावे, असे आवाहन कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे यांनी केले.

यामध्ये माणदेशी फाउंडेशन, शाखा सातारा येथील प्रोग्रॅम डायरेक्टर अपर्णा सावंत यांच्या योजने अंतर्गत महिला बंद्यांना रक्षाबंधनचे औचित्य साधून राखी प्रशिक्षण देण्यात आले.

# विधानसभा निवडणुकीमध्ये मराठा समाजाची ताकत दिसेल : मनोज जरांगे-पाटील

**सातारा** : राज्यातील सर्वसामान्य मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी ११ महिन्याचा लढा सुरु असूनही सगेसोयऱ्याच्या आरक्षणाबाबत सरकारने कुठलेही पाऊल उचलले नाही. याबाबत येत्या काळात निर्णय न झाल्यास मुंबईत जाऊन जाब विचारणार आहे. तसेच मराठा समाजाची ताकत काय आहे, हे आगामी निवडणुकांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात भाजपला दिसेल, असा ईशारा मनोज जरांगे-पाटील यांनी आज साताऱ्यात पत्रकार परिषदेत दिला.



सातारा जिल्ह्यात सुमारे ८५ हजार व राज्यात लाखो कुणबी नोंदी सापडल्याने आर्थिक निकषावर आरक्षणाचा प्रश्नच उदभवत नाही. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी आम्ही सुरुवातीपासून करत आहे. येत्या २९ ऑगस्टपर्यंत सग्यासोयऱ्याचा निर्णय न झाल्यास मराठा समाज थांबणार नाही. सरकारला ही शेवटची संधी असून आरक्षण दिल्यास सत्ताधार्यांना मराठा समाज डोक्यावर घेऊन नाचायलाही कमी करणार नाही. मात्र, भाजपचे देवेंद्र फडणवीस मराठा समाजाच्या विरोधात असल्याचे दिसून येत आहे. आमचा लढा आता आरक्षण घेतल्याशिवाय शांत राहणार नसून फडणवीसांनी आमच्या नादाला लागू नये, त्यांना मराठा समाजाची ताकत दाखवून देऊ, असा ईशारा मनोज जरांगे-पाटील यांनी दिला आहे. दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारसोबत शिवेंद्रसिंहराजेंनी चर्चा केल्यास आनंदच आहे.

## मोदी-शाहांसाठी महाराष्ट्र एटीएम; महायुतीला घरी पाठवून मोदी शाहांचे एटीएम बंद करू: नाना पटोले

**मुंबई** : भारतीय जनता पक्षाकडे भ्रष्टाचाराने कमावलेला पैसा आहे. दिल्लीत बसलेले दोन नेते महाराष्ट्राला एटीएम समजून लुटत आहेत. महाराष्ट्राला कंगाल करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपा युतीचा पराभव करून मोदीशाहांचे हे एटीएम बंद करू आणि महाराष्ट्राचा पैसा महाराष्ट्रातील जनतेसाठीच वापरू, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

महाविकास आघाडीचा पदाधिकारी मेळावा षण्मुखानंद सभागृहात संपन्न झाला, या मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गट नेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री अस्लम शेख, शिवसेना खा. संजय राऊत, खा. सुप्रिया सुळे, शेकापचे जयंत पाटील, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित होते.

यावेळी बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, लोकशाहीमध्ये विरोधी पक्षनेत्याला महत्वाचे स्थान आहे, सत्तापक्ष व विरोधपक्ष ही लोकशाहीची दोन चाके आहेत पण स्वातंत्र्य दिन सोहळ्याच्या कार्यक्रमात विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना योग्य स्थान दिले नाही, हा लोकशाहीचा खून आहे. भाजपामध्ये सत्तेची घमेंड व गर्व अजून आहे,